## :: प्रेस नोट ::

दि. ०८/१२/२०२२

आरोपी लोकसेवक - श्री.प्रकाश दशरथ शेळके वय ४१ वर्ष,पोलीस उप-निरीक्षक,पोलीस स्टेशन,सिरसाळा वर्ग ०२ मुळ रा.चांडोळ ता.जि.बुलढाण ह.मु.सिरसाळा जि.बीड. यांना १००००/- ( दहा हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई .

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | सिरसाळा |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री.प्रकाश दशरथ शेळके वय ४१ वर्ष,पोलीस उप-निरीक्षक,पोलीस स्टेशन,सिरसाळा वर्ग ०२ मुळ रा.चांडोळ ता.जि.बुलढाण ह.मु.सिरसाळा. |
| लाचेची रक्कम | १००००/- रुपये ( दहा हजार रुपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक.०५.१२.२०२२ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचा भाऊ श्री.गोविंद मुंडे यांचे विरुध्द दाखल गुन्हयात अटक पुर्व जामीनास सहकार्य केल्याचा मोबदला म्हणुन व तपासामध्ये मदत करण्यासाठी लोकसेवक पीएसआय श्री.शेळके हे २५०००/- रुपये लाचेची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दिली.<br>तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक.०५/१२/२०२२ रोजी पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री.शेळके यांनी तकरदार यांचे कडे पंचा समक्ष २५०००/- रुपये लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरुन दिनांक.०८/१२/२०२२ रोजी पंचासमक्ष सापळा लावला असता आलोसे श्री.शेळके यांनी २५०००/- रुपये लाचेची मागणी करुन पंचासमक्ष तडजोडीअंती १००००/- रुपये पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>आलोसे श्री.प्रकाश दशरथ शेळके वय ४१ वर्ष,पोलीस उप-निरीक्षक,पोलीस स्टेशन,सिरसाळा वर्ग ०२ मुळ रा. चांडोळ ता.जि.बुलढाणं ह.मु.सिरसाळा यांनी तक्रारदार यांचा भाऊ श्री.गोविंद मुंडे यांचे विरुध्द दाखल गुन्हयात अटक पुर्व जामीनास सहकार्य केल्याचा मोबदला म्हणुन व तपासामध्ये मदत करण्यासाठी तक्रारदार यांचे कडून पंचासमक्ष लाच रक्कम मागणी करुन ती स्विकारल्याने त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे सिरसाळा येथे गु.र.नं.२२४/२०२२ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. दिनांक ०९/१२/२०२२ रोजी आलोसे श्री.प्रकाश शेळके यांना ००.३७ वा. अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री.रविंद्र परदेशी पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि. बीड करीत आहोत. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद,श्री.विशाल खांबे,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि औरंगाबाद, श्री.शंकर शिंदे पोलीस उप-अधीक्षक,लाप्रवि बीड, यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र परदेशी,पोलीस निरीक्षक, व पोलीस अंमलदार ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड
संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**
2) **dyspacbbeed@gmail.com**
ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**
टोल फ्रि कमांक :- १०६४
दुरध्वनी कमांक :- ०२४४२-२२२६४९
व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००
पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ९९२३०२३३६१
अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ९८८११००८१२३
पोलीस उप अधीक्षक,लापवि,बीड :- ९३५५१००१००

( शंकर शिंदे )
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.